# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेचे म.न.पा.च्याजागेवर असलेले सार्वजनिक
**{स्लम विभाग }** शौचालय तोडण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेचे श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, महाल येथील नविन टाऊन हॉलच्या कामात अस्तित्वातील सार्वजनिक शौचालय बाधीत होत असल्याने महाल येथील गांधीबाग झोन कार्यालयाच्या लगत असलेले सार्वजनिक शौचालय तोडण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

- सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 32/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 30/07/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (स्लम), स्लम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेचे श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, महाल येथील नविन टाऊन हॉलच्या कामात अस्तित्वातील सार्वजनिक शौचालय बाधीत होत असल्याने महाल येथील गांधीबाग झोन कार्यालयाच्या लगत असलेले सार्वजनिक शौचालय तोडण्यास मंजूरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.